श्री हाके दिलीप आश्रुजी,
परिविक्षाधीन सहायक संचालक (रेशीम) (वेतनश्रेणी - रु.९३०० -३४८००, ग्रेड पे. ४६००) यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करणेबाबत.. .

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय, क्रमांक : आस्था- १९१५ /प्र.क्र.१२४/रेशीम कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १९ जानेवारी, २०१६.

वाचा:

१) **शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. नियुक्ती - १२१२/ प्र.क्र.१३२/ रेशीम कक्ष, दिनांक १० जुलै, २०१३.**
२) **संचालक (रेशीम) यांचे पत्र क्र. रे/कार्या-१/आस्था-३/परि.विक्षा/श्रीहाके/१०८१, दिनांक १५.१०.२०१५**

शासन निर्णय-

श्री. दिलीप आश्रुजी हाके यांची वर नमूद दिनांक १० जुलै, २०१३ च्या आदेशान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून सहायक संचालक (रेशीम), महाराष्ट्र रेशीम सेवा गट-अ या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी दिनांक १५.७.२०१३ रोजी म.नं. त्या पदाचा कार्यभार धारण केला आहे. श्री. हाके दिलीप आश्रुजी, सहायक संचालक गट- अ, यांनी त्यांचा दिनांक १५.७.२०१३ पासून २ वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी नियमितरित्या दिनांक १५.७.२०१५ रोजी पूर्ण केला असता. तथापि श्री हाके दिलीप आश्रुजी यांनी त्यांच्या परिविक्षाधीन कालावधीमध्ये एकूण २१ दिवस रजा उपभोगली असल्यामुळे त्यांचा परिविक्षाधीन कालावधी रजेइतक्या दिवसांनी पुढे वाढवून दिनांक ६.८.२०१५ रोजी समाधानकारकरित्या पुर्ण केला आहे.त्यामुळे त्यांचा परिविक्षाधीन कालावधी ६.८.२०१५ (मध्यान्होत्तर) रोजी समाप्त करण्यात येत आहे व त्यांची त्या पदावरील नियुक्ती दिनांक ६.८.२०१५ पासून नियमित करण्यात येत आहे.

२. हे आदेश शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग दि.२५, ऑगस्ट २०१५ अन्वये प्रशासकीय विभागाच्या अपर मुख्य सचिवांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०११९१४४४१५९३०२ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vilas Ramdas Thakur

Digitally signed by Vilas Ramdas Thakur
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=c8b1e52c5c4f922ab6eb7a0b44101c838aea34f29fbff0aebe9d85c3de3468c2, cn=Vilas Ramdas Thakur
Date: 2016.01.19 14:45:04 +05'30'

(वि.रा ठाकूर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति -

१) महालेखापाल १- महाराष्ट्र, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा) मुंबई
२) महालेखापाल २- महाराष्ट्र, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा) मुंबई
३) संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर
४) सहायक संचालक (रेशीम), प्रादेशिक रेशीम कार्यालय, औरंगाबाद
५) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद
६) श्री.दिलिप आश्रुजी हाके, सहा.संचालक (रेशीम) औरंगाबाद (मार्फत संचालक (रेशीम) रेशीम संचालनालय नागपूर)
७) निवड नस्ती (रेशीम कक्ष)